Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 47023)

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X, Issue - I
November - April - 2021-22
English / Marathi / Hindi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.571
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कांशीरामजी आणि बहुजन समाज पक्षाची यशस्वी वाटचाल याचा संशोधनात्मक अभ्यास<br>**श्रीमती. जयश्री सोनकवडे** | १-८ |
| २ | संत शेख महंमद महाराज आणि त्यांची वंशपरंपरा<br>**डॉ. नवनाथ दत्तात्रय वाजगे** | ९-१२ |
| ३ | लोकमान्य टिळकांचा समकालीन मराठी साहित्यावरील प्रभाव<br>**डॉ. संजयकुमार कोळी** | १३-१७ |
| ४ | महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांना होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास<br>**डॉ. पाठक सुहास सखाराम**<br>**झाकडे अर्चना प्रल्हाद** | १८-२२ |
| ५ | स्वतंत्र भारतातील बंजारा स्त्री<br>**डॉ. लक्ष्मण पवार** | २३-२७ |
| ६ | इंग्लंडची औद्योगिक क्रांती व त्याचा भारतावर पडलेला प्रभाव<br>**स्वप्नील देवराव मलोडे**<br>**प्रा. डॉ. आर. पी. किरमीरे** | २८-३२ |
| ७ | इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यासाठी जलद गतीने शिक्षण<br>**श्री. महेश मधुकर पालकर**<br>**प्रो. डॉ. मेघा म. उपलाणे** | ३३-३८ |
| ८ | कोवीड-१९ चा आंतरराष्ट्रीय धोरणांवर पडलेला प्रभाव<br>**डॉ. एस. आर. पाटील** | ३९-४२ |
| ९ | अन्नभेसळ व कायदे एक अभ्यास<br>**डॉ. गंगासागर तुळशीदास चोले** | ४३-४७ |
| १० | शाश्वत विकासामध्ये मानव विकास निर्देशांकाची भूमिका<br>**डॉ. प्रमोदिनी नवले (कदम)** | ४८-५१ |
| ११ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने व उपाय<br>**प्रा. डॉ. संजय मारोतराव देबडे** | ५२-५४ |

उत्सव प्रसंगी किंवा इतर विधी प्रसंगी त्यांच्या चालीरीती चे दर्शन आपल्याला घडते .यावेळी त्या मुक्तपणे पुरुषांच्यापुढे वावरतात च. भिती हा शब्द समूळ नाश होतो. उदा. होळी सणाचे लेंगी गीत.'

"भांळजारे भांळजा,
भोलोशो भाळजा, वासत
कुकडो कटाईती,
कुकडो बि खागो
बोकड बि खागो
टाग पकड गांड मार गोरे मारो रे, भोलोसो भाळजा."

अशी अश्लील भावनेचे दर्शन होळी उत्सवांच्या लेंगी गीतातून झाल्याशिवाय राहणार नाही. ज्या पाहुण्याला पाहुणचार करण्यासाठी घरी बोलावतो, त्यांचा पाहुणचार होतो ते एवढ्यावरच थांबत नाही, तर तो आपली शारीरिक वासनाही पूर्ण करून जातो. असा निर्भीडपणा बंजारा स्त्रीगीतातून येतो. अर्थात बंजारा स्त्रीला प्राचीन काळापासूनच जीवनातील सर्व स्वातंत्र्य आणि अधिकार मिळाले होते हे स्पष्ट होते. याची जाणीव लोकगीतातून झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून कुटुंब संवर्धनात बंजारा समाजातील स्त्रियांची भूमिका अतिशय महत्वाची होती हे स्पष्ट होते. अर्थात,,

बंजारा समाजातील शिकलेल्या स्त्रीला आज अंधश्रद्धेतून बाहेर पडता येत नाही. केवळ या समाजात जेवढ्या म्हातार्‍या स्त्रिया आहेत, त्या मात्र श्रद्धा अंधश्रद्धा फारशा मानताना दिसत नाहीत. त्या सरळ जीवन जगतात. कामातच राम आहे म्हणून कामाची पूजा केली पाहिजे. निसर्ग देव आहे, निसर्गाची पूजा केली पाहिजे, निसर्ग देवतेला मानले पाहिजे, हा त्यांचा सरळ आणि साधा सिद्धांत आहे. परंतु आज हा समाज गाव संस्कृतीच्या जवळ आलेला आहे शिक्षणाची गंगा तांडापर्यंत येऊन पोहोचलि, त्यामुळे काही प्रमाणात का होईना, तांड्यातील मुलमुले शिकू लागल्या. शिक्षणामुळे इतर समाजाच्या संपर्कात आल्या. परिणामी या समाजाच्या आचार, विचार, राहणीमान पोशाख, बोलीभाषा यांच्यावर परिणाम होऊन, त्या प्रथा आज बंदच होण्याच्या मार्गावर आहे. ज्याकाळी बंजारा बोली भाषाने तारले, तीच बोलीभाषा आज इतर समाजापुढे लपविताना दिसतो. संपर्कामुळे हिंदी, मराठी, इंग्रजी या भाषा ते बोलू लागले. पोषाख बदल झाला. नऊ मीटरचा लेंगा, कातळी जाऊन, त्यांची जागा साडी ने घेतली. टोपली, दंडात कडा, चोटला इत्यादी अलंकाराची जागा नाजूक अलंकाराने घेतली. आणि इतर समाजाप्रमाणे आपण कुठेही नोकरी करू शकतो, त्यांच्याप्रमाणे राहू शकतो ही भावना त्यांच्या मनात रुजली. परिणामी जंगलाच्या सानिध्यात जीवन व्यतीत करणार्‍या समाजात स्त्रि -पुरुष समानता आलेली दिसते. अधिकार तिला मिळालेले आहेत. मध्यकाळात तिच्या अधिकार कमी झाले होते, परंतु आज हिंदू संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आल्यामुळे, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांचे जीवन बदललेले आहेत.

येईल. या देशातील बंजारा समाजातील स्त्रिया बाबत काही वेगळे लिहिण्याची किंवा सांगण्याची गरज नाही. आजपर्यंत स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भरपूर प्रमाणात स्त्री विषयक लेखन केलेले दिसते. परंतु जेव्हा पुरुष लेखन करतो त्यावेळी पुरुष व्यवस्थेचा चष्मा फार प्रमाणात उतरललेला दिसून येत नाही. त्या लेखकांची भूमिका चांगली आहे परंतु स्त्री विषयक पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला दिसून येत नाही. या संदर्भातील लेखिका ताराबाई शिंदे यांचे विचार उल्लेखनीय वाटतात त्यांच्या मते,' स्त्री म्हणजे केवळ शोभेची वस्तू आहे का? वापर असेपर्यंत वापरणे आणि वापर संपला की फेकून देणे!! हे विचारले दोन प्रश्न पुरुष प्रधान व्यवस्थेला त्रासदायक आहे. म्हणून हे प्रश्न पुरुषांना विचार करायला भाग पडतातच.. आम्ही भेदाभेद मानत नाही आमच्याच स्त्रीला समान हक्क आहे असे म्हणणाऱ्या समाजात मात्र स्त्रियांची अवस्था पिंजर्यातल्या पोपटाचे सारखी आहे.' खायला खूप आहे, वरून तूप आहे परंतु तिच्या स्वातंत्र्याच्या दाराला मात्र सोनेरी कुलूप आहे'. अशी आज स्वतंत्र भारतात स्त्रियांची अवस्था झालेली आहे. ही अवस्था बंजारा समाजात पाहायला मिळत नाही परंतु आज इतर समाजाच्या संपर्कात आल्यामुळे स्त्रीच्या बाबतीत वेगळे काही म्हणता येणार नाही. स्वातंत्र्य अगोदर बंजारा समाजातील स्त्रीला आणि आजही काही प्रमाणात देवीचे देवीचे स्थान होते आणि आहे. पूर्वी या समाजात मातृसत्ताक पद्धती होती. स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जात जात नव्हता. त्यामुळे घरातील सर्व दैनंदिन व्यवहारांवर तिचे बारीक लक्ष असायचे. पुरुषांच्या मनमानी कारभाराला आळा बसायचाच त्यामुळे सुख समृद्धी आणि आनंद प्राप्ती यासारख्या गोष्टी सहजच मिळायच्या. घरातील सर्व स्त्रियांना मुलींना अभय मिळायचे स्वैराचार कुठेही असायचा नाही जंगलातील काम असो की शेतीचे कामे असो स्त्री-पुरुषांनी मिळून करायचे. काम करताना संकुचितपणा या शब्दाला वावच नव्हता. सर्वांची मने मोठी असायची मी मी तू तू हा शब्द नव्हताच त्यामुळे एकत्र कुटुंब पद्धती या समाजात विकसित झालेली पाहावयास मिळते. एकच शिकवण असायची,' कामे माईच राम छ '.'काम करीये तोच खायेंन मळीय'. अर्थात, कामातच राम आहे काम केले तरच खायला मिळेल. हा सरळ आणि साधा.

त्यांचा जीवन जगण्याचा सिद्धांत म्हणून पूर्वीची बंजारा स्त्री निर्भिडपणे जंगलाच्या सान्निध्यात आपल्या शेतीत आणि पशु पाण्यासोबत वावरतांना दिसते. तिने निसर्ग देवतांची पूजा केले. निसर्गातच धोंड्याला पूजले. त्यात त्यांना फारसा वेळ द्यावा लागला नाही. जेव्हा वेळ मिळेल, जसे जमेल तसे पूजा करून मोकळी झाले. इतर समाजातल्या स्त्रियांप्रमाणे नवस-सायास यात ती अडकून पडली नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र थोडेसे चित्र बदलताना दिसते. बंजारा स्त्रीला मातृसत्ताक पद्धती मुळे पूर्वीपासूनच सर्व अधिकार मिळालेले असल्यामुळे आजही काही प्रमाणात वयोवृद्ध स्त्रीला हे अधिकार मिळतातच. त्यामुळे आपल्या कुटुंबाला एका धाग्यात बांधून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य तिच्या हातून झालेले दिसून येतेच. सण उत्सव असो की अन्य कोणतेही प्रसंग असो तिला विचारल्याशिवाय काहीही केल्या जात नाही .कामाच्या बाबतीत बंजारा स्त्री-पुरुषांना तोडच नाही. जंगलात आपली जनावरे चरायला

नेणे. विचारून आणणे किंवा शेतीची कामे असो ही स्त्री आपल्या जिवाची पर्वा न करता निष्ठेने काम करताना दिसते. कुटुंबासाठी जीव गेला तरी चालेल पण जे काम वाट्याला आलेले आहे ते तीन निमूटपणे करताना दिसते. असेही म्हणावे लागेल कि ती सर्वच कामात पुरुषांपेक्षा ही एक पाऊल पुढे आहे. खऱ्या अर्थाने या समाजातील स्त्री आणि पुरुष हा कुटुंबाच्या रथाची दोन मजबूत चाके आहेत. असे गर्वाने सांगावेसे वाटते. स्त्रिया या पुरुषांपेक्षा कधीही बुद्धीने, शक्तीने कमी नाहीत. याचा परिचय या समाजातील स्त्रियांकडून आल्याशिवाय राहत नाही. प्राचीन काळापासून या समाजातील स्त्रीला विवाह विषयक अधिकार होते. हुंडा पद्धती अस्तित्वात नव्हती. मुलाकडंच्या लोकांनाच प्राण्यांच्या, वस्तूंच्या स्वरूपात हुंडा देण्याची पद्धती होती .अशामध्ये काही अपवाद वगळता बालपणी विवाह होत असायचे. परंतु जास्तीत जास्त विवाह वयात आल्यानंतरच. मुलींची इच्छा असेल तर विवाह होत असायचे. अशावेळी जर एखाद्या स्त्रीचा पती मेला आणि घरात लहान भावंडे आहेत, अशावेळी तिला त्यांच्या सोबत विवाह करण्याचा अधिकार होता. आयुष्यभर विधवा जीवन जगणे त्यांना मान्य नव्हते. लग्न करण्याची एकच अट असायची ती म्हणजे तो पतीचा लहान भाऊ दीर असावा. म्हणून विधवा स्त्रीच्या यातना बंजारा स्त्रीला भोगाव्या लागल्या नाहीत. परिणामी या समाजात सतीची प्रथा नव्हती.

हा समाज हिंदूधर्माचा एक घटक आहे. यात कुठलीही शंका नाही. या धर्मातील देवी-देवता रूढी, प्रथा, परंपरा, चालीरिती सर्व पाळल्या जातात. त्यांना ऐतिहासिक परंपराही आहे. ते शूरवीर होते, राजे-महाराजे होते यांचेही पुरावे आज आहेत. त्यांनी इंग्रजांना विरोध केला त्यामुळे तारेच्या कुंपणात स्वातंत्र्यानंतरही जीवन घालवावे लागले. परंतु भारतातील इंग्रजांच्या आगमनामुळे हा समाज देशोधडीला लागला संपूर्ण जगात विखुरला गेला. जीव वाचविण्यासाठी दऱ्या खोऱ्यांचा आश्रय घ्यावा लागला. त्यामुळे आज लोकांना वाटते की त्यांची संस्कृती वेगळी आहे. पण तसे नाही.

आधी हिंदू संस्कृतीतील सोळा संस्कार मानत होते आणि आजही सोळा संस्कार मानतात. परंतु यात बदल काय झाला? तर असे म्हणावे लागेल की संस्कृतीचा एक भाग असूनही केवळ जीव वाचविण्यासाठी त्यांनी आपला पोशाख ,बोलीभाषा त्यांना वेगळी करावी लागली. स्वतंत्र संस्कृती निर्माण केले. त्यामागचा हेतू हाच की आपण काय बोलतो? आपण कोण आहोत? हे कोणालाही कळू नये. स्वातंत्र्यानंतर जगातील सर्व बंजारा बोली भाषेचा अभ्यास केला तर ती बोली भाषा एक सारखीच आहे. त्यांची कदकाठी .

हा.. कुठे कुठे तर पोषाखात झालेला बदल आपल्याला दिसतो. परंतु गावाच्या जवळ आल्यामुळे त्यांच्या राहणीमानात बदल झालेला आहे. इतर समाजाच्या संपर्कामुळे त्यांची संस्कृती जीवनशैली व भाषेत बदल झालेला पाहावयास मिळतो पण आपल्या आगळ्यावेगळ्या जीवनशैलीची छाप त्यांनी इतर समाजावर पाडलेलीच आहे. यात कुठलीही शंका उद्भवत नाही.

त्यामुळे.' खायाला खूप आहे, वरून तूप आहे, स्वातंत्र्याच्या दाराला मात्र सोनेरी कुलूप आहे.' हे विधान आज पूर्णपणे खोटे ठरेल....

संदर्भ ग्रंथ

1. अंधश्रद्धेची वावटळ.. प्रा. चंद्रसेन टिळेकर
2. बंजारा समाज :जंगल आणि जीवन .डॉ. लक्ष्मण पवार
3. बंजारा समाज :संस्कृती आणि स्त्री .डॉ. लक्ष्मण पवार
4. भारतीय नारीः. स्वामी विवेकानंद
5. हिंदू संस्कृती आणि स्त्री :_साळुंखे आ. ह.